# शिवाजी ज्युनियर कनिष्ट महाविद्यालय येथे सायबर सुरक्षा बाबत कार्यशाळा संपन्न



अकोट :- अकोट येथिल शिवाजी ज्युनियर कनिष्ठ महाविद्यालय अंजनगाव रोड अकोट येथे नुकतीच सायबर सुरक्षा बाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.हरिदास खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली शितल साखरे,नेहा टेरे, सुमित सपकाळ,व अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा बाबत, ऑनलाईन फसवणूक,बाबत सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक,सायबर करीत असलेली ऑनलाईन खंडी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले .

शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय अकोट येथे नुकतीच सायबर सुरक्षा बाबत कार्यशाळा घेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रम संपन्न झाला .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक वालसिंगे होते. यावेळी हा कार्यक्रम क्विक हिल फाऊंडेशन पुणे आणी महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने व अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जगदीश साबू आणी भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.हरिदास खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली शितल साखरे,नेहा टेरे, सुमित सपकाळ,व अनिकेत भुडके यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना सायबरसुरक्षा म्हणजे काय?आणी सायबर क्राईमचे कोणते प्रकार पडतात ,वाढत्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन खरेदीची फसवणूक कशी होते,

मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक ,स्मार्टफोन मोबाईल मध्ये येणारे ऍप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते फेक वेबसाईट्स कशा ओळखाव्या ,फेटी एस पासवर्ड,ओटीपी,याबाबत फसव्या लिंक पासून दूर राहणे याबाबत मार्गदर्शन केले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वालसिंगे ,शिक्षक कडू ,गावंडे ,चौधरी , हिंगणकर व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

